ID

N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)
प्रथम खबर अहवाल
(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** पिंपरी-चिंचवड
**P.S.(ठाणे):** भोसरी एम.आय.डी.सी.
**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0309
**Year (वर्ष):** 2025
**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 05/06/2025 22:10

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |
| 2 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7(a) |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**
1. **Day(दिवस):** दरमियानी दिन
**Time Period (कालावधी):**
**Date From (दिनांक पासून):** 04/06/2025
**Date To ( दिनांक पर्यंत):** 05/06/2025
**Time From (वेळेपासून):** 10:40 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 11:30 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिनांक ):** 05/06/2025 **Time (वेळ):** 22:10 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**
**Entry No. (नोंद क्र.):** 041
**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 05/06/2025 22:10 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी
5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**
1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
पश्चिम, 1 किमी
**Beat No. (बिट क्र.):**
(b) **Address (पत्ता):** स्पाईन रोडवरील महाराष्ट्र राज,विदयुत वितरण कार्यालय, स्पाईन रोड,भोसरी 2 येथील कार्यालयात
(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
**District(State) (जिल्हा(राज्य)):**

FIR ची कॉपी मिळाली
[signature]



Scanned with CamScanner

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** मनेष शांताराम शेळके

(b) **Guardian's Name (पालक चे नाव) :**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1986

(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | गट नं 190 मोई,ताखेड जिपुणे,भोसरी एम.आय.डी.सी.,पिंपरी-चिंचवड, महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | गट नं 190 मोई,ताखेड जिपुणे,पुणे ग्रामीण,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):**

**Mobile (मोबाइल नं.):** 91-9604439402

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | रामप्रसाद सुखदेव नरवडे | | पालक का नाम : सुखदेव नरवडे | 1. सहायक अभियंता, महावितरण, ,उपविभाग भोसरी - 2 राशिव रोड,ग्लोबल सेरेनीटी सोसायटी, ,ए - 701, बोहाडेवाडी, मोशी , भोसरी एम.आय.डी.सी.,पिंपरी-चिंचवड,महाराष्ट्र,भारत |
| 2 | शामलाल असोकन | | | 1. सिल्व्हर नाईन सोसायटी, ई विंग फलट नं 1105,,मोशी, पुणे |



Scanned with CamScanner

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | | खाजगी इसम,भोसरी एम.आय.डी.सी.,पिंपरी-चिंचवड,महाराष्ट्र, भारत |

**8. Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

**9. Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|

**10 Total value of property (In Rs/-)**
(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):

**11.Inquest Report / U.D. case No., if any**
(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

**12.First Information contents** (प्रथम खबर हकीकत ):

गु.रजि. क्रमांक व कलम- 309/2025 भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम 1988 चे कलम – 7, 7अ प्रमाणे.
फिर्याद दि.05/06/2025

मी मनेष शांताराम शेळके वय- 39 वर्षे, रा. गट नं 190 मोई, ता.खेड जि.पुणे मो नं 9604439402 माझी समीधा इलेक्ट्रीकल्स नावाची शासकीय परवाना असलेली फर्म आहे. सदर फर्मच्या माध्यमातुन मी शासकीय विदयुत ठेकेदार म्हणुन काम करतो. मी महावितरण विभागाचे लायझनिंग व सँगशनिंगचे कामे करतो. माझा शायकीय परवाना क्रं एमसी/29607 असा आहे. सदरचा व्यवसाय हा मी मागील 10 वर्षापासुन करीत आहे.

आज रोजी भोसरी एमआयडीसी पोलीस स्टेशन येथे समक्ष हजर राहुन जबाब लिहुन देतो की,मागील 10 वर्षापासुन मी महावितरण विभागाचे काम करतो. त्यामध्ये नविन ट्रान्सफार्मर बसविणे, नविन मिटर बसविणे, केबल टाकणे, व इतर इलेक्ट्रीक विभागाशी संबधीत कामे करतो तसेच मेटेनन्सचे सुध्दा काम करतो.

दिनांक 03/03/2025 रोजी मला मोहमंद आरिफ खान रा.गट नं 710, रोडे कॉप्लेक्सच्या मागे, कुदळवाडी चिखली ता.हवेली जि.पुणे यांनी त्यांचे घरासाठी नविन घरगुती मिटर बसविण्याचे मला काम दिले होते. त्यानुसार मी त्यांचे वतीने नविन मिटर मिळणेकामी महावितरणच्या साईटवर मी दिनांक 04/03/2025 रोजी ऑन ऑन लाईन अर्ज केला होता. त्या ऑनलाईन केलेल्या अर्जासाठी मी दिनांक 05/03/2025 रोजी स्पाईन सिटी शाखा येथील महावितरण उपविभागाचे कार्यालयात चौकशी करणेसाठी मी तेथील सहायक अभियंता श्री. रामप्रसाद नरवडे, सहायक अभियता, स्पाईन सिटी, भोसरी-2 यांचेकडे गेलो असता, मला उडवाउडविची उत्तरे दिली. त्यानंतर मी वारंवार सदरच्या कार्यालयात चौकशीकामी जात होतो. दिनांक 17/05/2025 रोजी नरवडे साहेब यांनी त्यांचे वायरमन श्री.कुमार जाबगोंड यांना पहाणी करण्यास सांगीतले त्यावरुन वायरमन जाबगोंड यांनी पहाणी करुन तसा अहवाल नरवडे साहेबांकडे सादर केला. श्री.नरवडे साहेबांनी तो अहवाल मार्गदर्शन मिळणेकामी तेथील अतिरीक्त कार्यकारी अभियंता भोसरी 2 उपविभाग महावितरण श्री. राजेश भगत यांना सादर केला. भगत साहेबांनी त्या अहवालावर पीसीएमसीकडे कायदेशिर सल्ला घेणेबाबत शेरा मारला होता. त्यानंतर मी वारंवार याबाबत श्री.रामप्रसाद नरवडे, सहायक अभियंता यांचेकडे चौकशीकरीता गेलो परंतु आज करतो उदया करतो असे म्हणुन टाळाटाळ करीत होते.

दिनांक 02/06/2025 रोजी मी पुन्हा नरवडे साहेबांकडे यांचेकडे सुमारे 11.00 वा गेलो असता कनेक्शन मंजुर करणेसाठी 30 ते 35 हजार रुपये खर्च येईल असे त्यांनी मला सांगीतले. सदरची बाब ही मी माझे ग्राहक मोहमंद आरिफ खान यांना सांगीतली. व नरवडे साहेब हे मला तुमचे मिटर मंजुर करण्यासाठी लाच मागत आहे म्हणुन त्यांचे विरुध्द मी लाचलुचप प्रतिबंधक विभागाकडे तक्रार करणार असल्याचे सांगीतले. यावर माझे ग्राहक मोहमंद खान यांनी नरवडे यांचेविरुध्द कारवाई करणेसाठी काहीच हरकत नसल्याचे मला सांगीतले. त्यानंतर मी



Scanned with CamScanner

सुमारे सायं. 4.30 वाजेच्या सुमारास लाप्रवि विभाग पुणे येथे तकार देणेसाठी गेलो. त्याठिकाणी आम्ही श्री. दयानंद गावडे, पोलीस उपअधिक्षक यांना भेटलो व आमची तोंडी तक्रार सांगीतली यावर श्री.गावडे साहेबांनी तात्काळ तेथील अधिकारी पोनि लोणारे यांचेकडे पाठविले पोनि लोणारे यांनी आमची तक्रार ऐकुन घेतली व माझे स्वहस्ताक्षरात लिहुन घेवुन उदया दिनांक 03/06/2025 रोजी सकाळी कारवाई करण्याचे आम्ही ठरविले. दिनांक 03/06/2025 रोजी मी दिलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने पोनि लोणारे व त्यांचे सापळा पथक हे सकाळी 10.00 वाजेच्या सुमारास स्पाईन रोडवरील कैलास भेळ या ठिकाणी आले. पोनि लोणारे यांनी सापळा पथक, पंचांची व माझी ओळख करुन दिली. मी माझ्या स्वहस्ताक्षरामध्ये मी लिहुन दिलेली तक्रार ही पंचांना दाखविली सदर तक्रार पंच क्रं 1 प्रशांत कणसे व पंच क्रं 2 नितीन पासलकर अश्या दोन्ही पंचांनी वाचली व त्यावर सहया केल्या. त्यानंतर पोनि लोणारे यांनी मला पडताळणी व सापळा कारवाई बाबत माहीती दिली. त्यानंतर पोनि लोणारे यांनी मला व्हाईस रेकॉर्ड दाखविले व त्याबाबत माहीती दिली. त्यानंतर मी दिलेल्या तक्रारीच्या अनुशंगाने पंच क्रं 1 म्हणुन श्री. प्रशांत पांडुरंग कणसे, वय 35 वर्षे, पद - राज्यकर निरीक्षक, वस्तु व सेवाकर भवन, येरवडा, पुणे व पंच क्रं 2 म्हणुन श्री. नितीन काशीनाथ पासलकर, वय 44 वर्षे, पद - कर सहायक, वस्तु व सेवाकर भवन, येरवडा, पुणे हे पंच म्हणुन काम पाहतील असे पोनि लोणारे यांनी ठरविले. मी दिलेल्या तक्रारीचे अनुषंगाने पोनि लोणारे यांनी माझे व पंच क्रं 1 प्रशांत कणसे यांचे निवेदन 11.37 वा. व्हॉईस रेकॉर्डमध्ये रेकॉर्ड करुन लोकसेवक श्री. रामप्रसाद नरवडे, सहायक अभियता, स्पाईन सिटी, भोसरी-2 हे लाचेची मागणी करतात किंवा कसे यासाठी लाचेच्या मागणीची पडताळणी कारवाई स्पाईन रोडवरील पर्ल बँक्वेट हॉलच्या बाजुस असलेल्या मोकळया जागेतुन करण्याचे सर्वानुमते ठरविण्यात आले. त्यानंतर पोनि लोणारे यांनी मला सुचना देवुन व्हाईस रेकॉर्डर चालू करुन तो माझे शर्टच्या आतमध्ये सेफटी पिनच्या सहाय्याने लावुन दिला व मला माझेकडील पांढ-या रंगाची सिफट कार चारचाकी क्रं एमएच 14 एमएफ 3346 मधुन लोकसेवक श्री. रामप्रसाद नरवडे, सहायक अभियता, स्पाईन सिटी, भोसरी-2 यांची भेट घेणेकामी पंच क्र.1 यांचेसह रवाना केले. त्यावेळेस मी स्वता: गाडी चालवित होतो व पंच श्री. कणसे हे माझे बाजुचे सिटवर बसलेले होते. मी ,पंच क्र 1 यांचेसोबत माझे चारचाकी वाहनामधुन महावितरण कार्यालय स्पाईन सिटी, भोसरी-2 येथे गेलो असता त्याठिकाणी श्री.नरवडे साहेब नसल्याचे मला समजले म्हणुन मी माझा मोनं 9604439402 यावरुन श्री. नरवडे यांचा मो नं 7875767491 यावर फोन केला व सदरचा कॉल व्हाईस रेकॉर्डर मध्ये रेकॉर्ड होणेसाठी माझ्या मोबाईल फोनचा स्पिकर फोन ऑन केला असता श्री. नरवडे यांनी मला मी ट्रेनिंगसाठी पुण्यात आलो आहे. मी उदया येईल असे सांगीतल्याने मी व पंच क्रं 1 असे पुन्हा सापळा पथक थांबलेल्या ठिकाणी 11.55 वा परत आलो व मी पोनि लोणारे यांना श्री.नरवडे हे ट्रेनिंगला गेले असुन ते उदया येणार आहेत. म्हणुन पोनि लोणारे यांनी सदरची कारवाई दुसरे दिवशी दिनांक 04/06/2025 रोजी करण्याचे सर्वानुमते ठरविण्यात आले.

दिनांक 04/06/2025 रोजी सकाळी पोनि लोणारे व सापळा पथक हे स्पाईन रोडवरील पर्ल बँक्वेट हॉलच्या बाजुच्या मोकळया जागेत सकाळी 10.20 वाजता पोहचलो. सदर ठिकाणी मी माझी चारचाकी स्विफट क्रं. एमएच-14-एमएफ-3346 मधुन त्याठिकाणी आलो. त्यानंतर पुन्हा माझे व पंच नं. 1 श्री. प्रशांत पांडुरंग कणसे यांचे पडताळणी कारवाईचे निवेदन 10.25 वा. ध्वनिमुद्रीत केले व पुन्हा पोनि लोणारे यांनी सुचना देवुन मला लोकसेवक नरवडे यांची भेट घेणेकामी सकाळी 10.42 वा. चे सुमारास पंच क्र.1 सोबत मी माझे गाडीमधुन महावितरण कार्यालय भोसरी येथे गेलो. तेथे नरवडे साहेब नसल्याने मी तेथील कर्मचारी यांना इशा-याने “नरवडे साहेब कुठे आहेत” अशी विचारणा केली. त्यावर त्यांनी “साहेब आले नाहीत” असे सांगीतले त्यानंतर पुन्हा मी माझा मोनं 9604439402 यावरुन श्री. नरवडे यांचा मो नं 7875767491 यावर फोन केला व सदरचा कॉल व्हाईस रेकॉर्डर मध्ये रेकॉर्ड होणेसाठी माझ्या मोबाईल फोनचा स्पिकर फोन ऑन केला असता लोकसेवक नरवडे साहेबांनी माझा फोन रिसीव्ह केला. तेव्हा मी त्यांना म्हणालो की, “नरवडे साहेब, तुमची वाट पाहतोय ऑफिसला” त्यावर लोकसेवक नरवडे हे मला म्हणाले की, “मी आज सीडीसीला जाणार आहे, मी लक्ष्मी चौकात आहे, येवुन जा” असे बोलले यावर मी नरवडे यांना “हो हो, पाच मिनीटात येतो मी साहेब” असे बोलले. व फोन कट केला. त्यानंतर मी व पंच क्रं 1 असे माझे वाहनाने लक्ष्मी चौकात पोहोचत असताना मी पुन्हा नरवडे साहेब यांना फोन केला व “मी लक्ष्मी चौकात आलो असल्याचे सांगीतले.” त्यावेळी नरवडे यांनी “मी लक्ष्मी चौकाच्या मागेच आहे” असे सांगीतले. त्यावेळी मी नरवडे यांना हा हा.. दिसले, समोर आहे का तुम्ही? येता गाडीत” असे बोलले त्यावर लोकसेवक नरवडे हे मला म्हणाले की, “ ये ना, तु गाडी लाव पुढ, मी तुझ्या मागे लावतो” असे बोलले. त्यावर मी नरवडे यांना “ बर या बघा हितच लावतो मी, येता का गाडीत? का तुमच्या गाडीत येवु? अशी विचारणा केली त्यावर लोकसेवक नरवडे ह मला “माझ्या गाडीत ये ना” असे बोलले त्यावर मी “हा आलो आलो” असे म्हणाले व फोन कट केला. त्यानंतर मी पंच क्रं 1 यांना इशा-याने आमच्या मागे उभ्या असलेल्या पांढ-या रंगाच्या इर्टीका कार वाहनात लोकसेवक नरवडे असल्याचे सांगीतले. त्यानंतर मी व पंच क्रं 1 श्री कणसे असे माझ्या वाहनातुन खाली उतरलो. नरवडे यांनी मला



Scanned with CamScanner

गाडीत तुच बस असा इशारा केला. म्हणून मी लोकसेवक नरवडे यांचे वाहनात जाऊन बसलो त्यावेळी पंच क्रं 1 लोकसेवक नरवडे यांचे वाहनाच्या दाराजवळ उभे होते व त्यावेळेस गाडीच्या काचा खाली होत्या. मी वाहनात बसलेनंतर लोकसेवक नरवडे यांनी मला "पंचांकडे इशारा करत कोण आहेत अशी विचारणा केली" त्यावर मी त्यांना "भाडेकरु आहे, तो मोहंमद अरिफ खानचा" असे बोललो. त्यानंतर मी लोकसेवक नरवडे यांचेसोबत माझे प्रलंबीत कामासंर्भात चर्चा केली. त्यावेळी लोकसेवक नरवडे हे मला "ऐक ना, काय करु माहितीये का?" "आपण एनओसी साठी पाठवुन देऊ, इनवर्ड करुन घे तु, मीच पाठवतो" असे म्हणाले. त्यावर मी त्यांना "हा" म्हणालो. त्यानंतर लोकसेवक नरवडे मला " 35 हजार रुपये दे, आणि कनेक्शन चालू करुन देऊ" असे म्हणाले. त्यावर मी त्यांना "35 हजार नाही होणार थोड फार कमी करा" असे म्हणालो. त्यावर लोकसेवक नरवडे मला "साहेबांना बोलतो ना मी किती म्हणतोय कंझ्युमर सांग" असे बोलले. त्यावर मी त्यांना "कंझ्युमरच काय नाय साहेब, आता आपण काम घेतलय म्हटल्यावर" असे बोललो त्यावर लोकसेवक नरवडे मला "पण विषय कसाए"असे बोलले त्यावर मी त्यांना " 25 हजार देऊ का साहेब?" असे बोललो त्यावर लोकसेवक नरवडे मला "ठिक ए, मी बोलतो, तुझ्यासाठी, देतो करुन तेवढ" असे म्हणाले त्यावर मी त्यांना "तुम्ही कधी भेटणार मला" अशी विचारणा केली त्यावेळी ते मला "चार, पाच वाजता येणार ऑफिसला" असे म्हणाले. त्यावर मी त्यांना " विषय मार्गी लावुन टाका साहेब, लय अडचणी ए कंझ्युमरला ओ" असे बोललो त्यावर लोकसेवक नरवडे मला " हा.. ठिक ए ना, आपण हे करुन घेऊ तस" त्यावर मी त्यांना "पण बर का साहेब 25 हजार" असे बोललो त्यावर ते मला "हो" हो" ठिक ए" असे बोलले. त्यानंतर आमच्यामध्ये पुन्हा कामासंदर्भात चर्चा झाली त्यानंतर मी त्यांचे इर्टीका क्रं एमएच 21 बीएफ 8887 या वाहनातुन खाली उतरलो व माझे वाहनात येऊन बसलो त्यावेळी पंच क्रं 1 माझेसोबत माझे वाहनात येऊन बसले. माझ्या व नरवडे यांचेमध्ये झालेले संपुर्ण संभाषण पंच क्रं 1 श्री. प्रशांत कणसे यांनी गाडीच्या काचा खाली असल्याने ए◌ैकले व त्यानंतर आम्ही सदर ठिकाणाहुन निघुन सापळा पथक थांबले त्याठिकाणी परत आलो. तेथे आल्यानंतर मी पोनि लोणारे यांना पंच क्रं 2 पासलकर यांचेसमक्ष घडलेली हकीकत सांगीतली. एकंदरीत झालेल्या पडताळणीवरुन श्री. नरवडे, सहायक अभियंता, म.रा.वि.वि., स्पाईन रोड, भोसरी यांनी घरगुती विदुयत कनेक्शन घेऊन देणेकरीता केलेल्या अर्जावरुन विदुयत कनेक्शन देणेकरीता 35,000/- रुपये लाच रकमेची मागणी करुन तडजोडीअंती 25,000/- रुपये स्वत:करीता व साहेबांकरीता मागीतल्याचे निष्पन्न झाले. मी नरवडे यांचे गाडीत बसल्यावर गाडीच्या काचा खाली असल्याने माझे व नरवडे यांचेमधील झालेले संभाषण पंच क्रं 1 कणसे यांनी ए◌ैकले आहे व आम्ही दोघे गाडीत बोलत होतो हे पंच क्रं 1 श्री. कणसे यांनी पाहीलेले आहे. परंतु नरवडे साहेब हे त्यांचे वरीष्ठ श्री. भगत, अतिरीक्त कार्यकारी अभियंता, स्पाईन सिटी भोसरी 2 यांचेकरीता लाच मागत असल्याचे मी पोनि लोणारे यांना सांगीतले म्हणुन पोनि लोणारे यांनी श्री.भगत यांचेकडे पडताळणी करण्याचे ठरविले. परंतु त्याच दरम्यान जोरदार पाऊस सुरु झाल्याने सदर ठिकाणी थांबणे सोईचे नसल्याने आम्ही मी पोनि लोणारे यांनी मला थांबण्यसाठी दुसरी जागा आहे का असे विचारल्यावर मी पोनि लोणारे यांना थांबण्यासाठी माझा मित्राचे शाईन स्क्वेअर बिल्डींग येथे मल्टी सव्र्हीसेस चे कार्यालय, चिखली येथे असुन ते सध्या बंद आहे त्या ऑफिसची चावी माझ्याकडेच असल्याचे सांगीतल्याने पोनि लोणारे यांनी पुढील कार्यवाही सदर ठिकाणा◌ी जावुन करणेबाबत सर्वानुमते ठरविण्यात आले. त्याप्रमाणे संपुर्ण पथक हे शासकीय वाहनाने माझ्या मागोमागे निघाले ती वेळ दुपारी 12.30 वा ची होती. त्यानंतर मी व संपुर्ण पथक शाईन स्क्वेअर बिल्डींग येथे मल्टी सव्र्हीसेसच्या कार्यालियामध्ये चिखली येथे दुपारी 12.55 वा चे सुमारास पोहोचलो.

त्यानंतर पोनि लोणारे यांनी अतिरीक्त कार्यकारी अभियंता श्री.भगत साहेब यांचेकडे पडताळणी कारवाई करण्याचे अनुषंगाने मला व पंच क्रं 1 कणसे यांना सुचना देवुन पुन्हा व्हॉईस रेकॉर्डर चालू करुन तो माझ्या शर्टच्या आतमध्ये सेफटी पिनच्या सहाय्याने लावुन दिला. माझ्या खाजगी वाहन स्विफट क्रमांक एमएच-14-एमएफ-3346 मधुन लोकसेवक भगत यांची भेट घेणेकामी दुपारी 13.52 वा. चे सुमारास पंच क्र.1 यांचेसह रवाना केले. मी व पंच क्रं 1 श्री.कणसे असे माझे चारचाकी वाहनामधुन स्पाईन रोड, भोसरी येथील महावितरण कार्यालयात गेलो. सदर ठिकाणी लोकसेवक भगत, अतिरीक्त कार्यकारी अभियंता हे त्यांचे केबीनमध्ये उपस्थित होते. आम्ही थोडावेळ त्यांचे कॅबीनच्या बाहेर उभे राहीलो नंतर मी त्यांचे केबीनचा दरवाजा उघडुन भगत साहेब यांना "आत येऊ का" असे विचारले त्यावर भगत साहेब यांनी आम्हाला आतमध्ये बोलावील्याने आम्ही त्यांचे केबीनमध्ये गेलो. त्यावेळी मी लोकसेवक भगत यांचेसोबत कामासंदर्भात चर्चा करीत असताना "नरवडे साहेब म्हणाले देतो करुन" असे बोलले. त्यावर लोकसेवक भगत हे मला म्हणाले की, "मग तुम्ही तुमचं पहा" असे म्हणाले परंतु श्री. भगत यांनी कोणताच प्रतिसाद न दिल्याने मी व पंच माझे वाहनाने पोनि लोणारे व पथक थांबलेल्या ठिकाणी 14.42 वा परत आलो.

लोकसेवक नरवडे यांनी सायंकाळी 4-5 वाजेपर्यंत लाच रक्कम घेऊन बोलावले असल्याचे निष्पन्न झल्याने पोनि लोणारे यांनी लोकसेवक नरवडे यांनी मागणी केल्याप्रमाणे 25,000/- रुपये लाच रक्कम मला हजर करण्याबाबत



Scanned with CamScanner

सांगितले असता मी माझेकडील बचतीतील 25,000/- रुपये रक्कम हजर केली. त्यानंतर पो.नि. लोणारे यांचे सुचने प्रमाणे मी हजर केलेल्या 500/- रुपये दराच्या 50 नोटांचे नंबर मपोहवा काळे यांनी पंच क्रं 02 यांचे मदतीने एका को -या कागदावर आमचे समक्ष नमूद करुन घेतल्या. त्यानंतर पो.नि. लोणारे यांचे सुचनेवरुन पोशि/दिवेकर यांनी शाईन स्क्वेअर बिल्डींग येथे मल्टी सर्व्हीसेसच्या दोन्ही पंच साक्षीदार व मला अल्ट्राव्हॉयोलेट दिवा व अँथ्रासिन पावडर दाखवून कार्यवाहीतील त्यांचे उपयोग व गुणधर्म समजावुन सांगुन लाच रकमेला अल्ट्राव्हॅायोलेट पावडर लावली व त्यानंतर पोशि दिवेकर यांनी हात स्वच्छ पाण्याने धुतले व त्यांना पुन्हा सापळा पथकात सामील करुन घेण्यात आले. त्यानंतर त्या नोटा माझ्या पँटच्या समोरील उजव्या खिशांत ठेवल्या. त्यानंतर पो.नि. लोणारे यांनी मला व सापळा पथकास सापळा कारवाई अनुषंगाने सुचना दिल्या. तसेच मपोहवा काळे यांना त्यांचे मोबाईल फोनमध्ये लाच रक्कम जप्त करतेवेळी त्याचे चित्रीकरण करावे असे ठरले. व लाच रक्कम गाडीमध्ये दिल्यानंतर गाडीचे चारही इंडीकेटर लावुन इशारा करण्यास सांगीतला. तसेच गाडीच्या बाहेर लाच रक्कम दिल्यास मी माझ्या पँटच्या डाव्या खिशातुन डाव्या हाताने हातरुमाल काढुन तोंडावरुन फिरवुन लाच रक्कम स्विकारण्याचा इशारा करण्यास सांगीतले.

त्यानंतर पोनि लोणारे यांनी 17.23 वा व्हॉईस रेकॉर्डर चालु करुन तो माझे शर्टचे आत सेफटी पिनच्या साहयाने लावुन मला पंच नं. 1 श्री. प्रशांत कणसे यांचेसोबत माझे चारचाकी गाडीतुन रवाना केले. त्यावेळेस सुध्दा मीच गाडी चालवित होतो व पंच श्री. प्रशांत कणसे हे पुढच्या सिटवर बसले होते. आम्ही निघाल्यावर आमचे मागोमाग संपुर्ण सापळा पथक स्पाईन रोड, भोसरी महावितरण कार्यालयाच्या आवारात कोणासही संशय येणार नाही अशा प्रकारे सापळा लावून थांबले. तेव्हा मी व पंच क्रं 1 कणसे आमचेकडील चारचाकी वाहन कार्यालयाच्या परिसरामध्ये पार्क करुन महावितरण कार्यालयात गेलो त्यावेळी लोकसेवक नरवडे हे त्यांचे कक्षात उपस्थित नव्हते. त्यावेळी मी व पंच क्रं 1 असे कार्यालयातुन बाहेर येऊन माझ्या वाहनात बसलो. मी माझ्या मोबाईलवरुन लोकसेवक नरवडे यांना फोन करुन मोबाईल फोनचा स्पिकर ऑन केला त्यावेळी लोकसेवक नरवडे यांनी माझा कॉल रिसीव्ह केला त्यावेळी मी लोकसेवक नरवडे यांना “साहेब ऑफिसला येणार होतो, म्हणुन फोन करत होतो” असे बोललो त्यावेळी लोकसेवक नरवडे मला “कार्यक्रमासाठी बाहेर आलो आहे, आलो तर फोन करतो, नाही आला तर नाही समजा” असे म्हणाले व फोन कट केला. लोकसेवक नरवडे यांची भेट न झाल्याने मी व पंच माझे वाहनाने पोनि लोणारे यांनी दिलेल्या सुचनेप्रमाणे स्पाईन रोडवरील पर्ल बँक्वेट हॉलच्या बाजुस असलेल्या मोकळया जागेत येऊन थांबलो. आमचेमागोमाग संपुर्ण पथक शासकीय वाहनाने आले. त्यानंतर पोनि लोणारे यांनी माझेकडील व्हॉईस रेकॉर्डर ताब्यात घेऊन बंद केला. ती वेळ 17.57 वा ची होती. त्यानंतर पोनि लोणारे यांनी प्रथम पंच क्रं 1 कणसे व त्यानंतर माझ्याकडुन सापळा कारवाईदरम्यान झालेल्या घटनेबाबत माहिती घेतली त्यावेळी मी व पंच क्रं 1 कणसे यांनी सापळा कारवाई दरम्यान घडलेल्या घटनेची माहिती पोनि लोणारे यांना पंच क्रं 2 श्री पासलकर यांचे समक्ष सांगीतली. त्यावेळी मी पोनि लोणारे यांना कार्यालयीन कामकाजाची वेळ संपत आल्याने व लोकसेवक नरवडे यांची कार्यालयात येण्याची शक्यता कमी असल्याने आपण पुढील कारवाई दि. 05/06/2025 रोजी करण्याची विनंती केल्याने आज दि. 05/06/2025 रोजी कारवाई करण्याचे ठरविण्यात आले होते. त्यावेळी सापळा कारवाई दरम्यान वापरण्यात आलेली लाच रक्कम हि पोनि लोणारे यांनी ताब्यात घेऊन एका खाकी पाकीटात सुरक्षीत ठेवली. त्यानंतर पोनि लोणारे यांनी मला स्पाईन रोडवरील पर्ल बँक्वेट हॉलच्या बाजुस असलेल्या मोकळया जागेत दि. 05/06/2025 रोजी सकाळी 10.00 वा हजर राहणेबाबत सुचना दिली होती.

दि. 05/06/2025 रोजी पोनि लोणारे यांनी दिलेल्या सुचनेप्रमाणे मी स्पाईन रोडवरील पर्ल बँक्वेट हॉलच्या बाजुस असलेल्या मोकळया जागेत सकाळी 10.00 वा चे सुमारास येऊन थांबलो काहिवेळात सदर ठिकाणी पोनि लोणारे व त्यांचे पथक आले. त्यानंतर पोनि लोणारे यांनी त्याचे ताब्यात दि. 04/06/2025 रोजीच्या कारवाईनंतर सुरक्षीतरित्या ठेवलेली त्याच नंबरच्या नोटांची लाच रक्कम व मेमरीकार्ड आमच्यासमक्ष हजर केले. त्यानंतर पोनि लोणारे यांनी मला लोकसेवक नरवडे यांच्या बाबत विचारणा केली असता ते सकाळी 10.30 वा. कार्यालयात येणार असल्याची खात्रीशीर माहिती असल्याचे मी त्यांना सांगीतले. त्यानंतर पो.नि. लोणारे यांनी दिनांक 04/06/2025 सापळा परत कारवाई नंतर त्यांचे ताब्यात सुरक्षीत ठेवलेली लाच रक्कम खाकी पाकीटातु काढुन गाडीमध्ये कृत्रीम अंधार करुन लाच रकमेवर अल्ट्राव्हॉयोलेट लाईच्या साहयाने अँथ्रासिन पावडर असल्याचे दाखविले व त्या अँथ्रासिन पावडर असलेल्या नोटा माझ्या काळया रंगाच्या जिन्स पँटच्या समोरील उजव्या खिशांत ठेवल्या व पोनि लोणारे यांनी त्यांचे हात पाण्याने स्वच्छ धुतले. त्यानंतर पो.नि. लोणारे यांनी मला व सापळा पथकास सापळा कारवाई अनुषंगाने सुचना दिल्या. तसेच मपोहवा काळे यांना त्यांचे मोबाईल फोनमध्ये लाच रक्कम जप्त करतेवेळी त्याचे चित्रीकरण करावे असे ठरले. व लाच रक्कम गाडीमध्ये दिल्यानंतर गाडीचे चारही इंडीकेटर लावुन इशारा करण्यास सांगीतला. तसेच गाडीच्या बाहेर लाच रक्कम दिल्यास मी माझ्या डोळयावरील चष्मा काढुन लाच रक्कम



Scanned with CamScanner

स्विकारणेबाबतचा इशारा करण्यास सांगीतले. त्यानंतर पोनि लोणारे यांनी 10.26 वा व्हॉईस रेकॉर्डर चालु करुन तो माझे शर्टचे आत सेफटी पिनच्या साहयाने लावुन मला पंच नं. 1 श्री. प्रशांत कणसे यांचेसोबत माझे चारचाकी गाडीतुन रवाना केले. त्यावेळेस सुध्दा मीच गाडी चालवित होतो व पंच श्री. प्रशांत कणसे हे बाजुच्या सिटवर बसले होते. आम्ही निघाल्यावर आमचे मागोमाग संपुर्ण सापळा पथक स्पाईन रोड महावितरण कार्यालयाच्या आवारात कोणासही संशय येणार नाही अशा प्रकारे सापळा लावून थांबले. तेव्हा मी व पंच क्रं 1 कणसे आमचेकडील चारचाकी वाहन स्पाईन सिटी भोसरी कार्यालयाच्या परिसरामध्ये पार्क करुन महावितरण कार्यालयात गेलो त्यावेळी लोकसेवक नरवडे हे त्यांचे केबीनमध्ये उपस्थित होते. त्यावेळी त्यंाचे केबीनमध्ये एक इसम हजर होता. आम्ही कार्यालयात गेलेनंतर पोशि ठाकुर हे आमचे मागोमाग कार्यालयाच्या आतमध्ये कोणासही संशय येणार नाही अशा रितीने येऊन थांबले. त्यानंतर आम्ही लोकसेवक नरवडे यांचे केबीन बाहेर थांबलो. काहिवेळाने मी लोकसेवक नरवडे यांचे केबीनचा दरवाजा उघडला त्यावेळी पंच क्रं 1 कणसे हे माझ्यासोबतच होते. त्यावेळी लोकसेवक नरवडे यांनी मला त्यांचेजवळ असलेल्या इसमाकडे इशारा करत हळु आवाजात "शामकडे, त्याला भेटुन घ्या." असे बोलले, त्यावर मी लोकसेवक नरवडे यांनी सांगीतलेल्या इसकमाडे इशारा करत "त्याला का? शाम" असे बोललो त्यावर लोकसेवक नरवडे यांनी होकारार्थी इशारा केला. सदरचे संभाषण हे पंच क्रं 1 श्री. कणसे यांनी एैकले. त्यानंतर सदरील इसम लोकसेवक नरवडे यांचे केबीनच्या बाहेर आला. त्यावेळी मी, पंच क्रं 1 व सदर इसम केबीनच्या बाहेरील मोकळ्या पॅसेजमध्ये येऊन थांबलो. त्यावेळी मी त्या इसमास पंच क्रं 1 श्री. कणसे यांचेसमक्ष "शाम ऐक ना, ये ना इथंच" असे बोलले. त्यावेळी तो इसम माझे व पंच क्रं 1 कणसे यांचेजवळ आला. त्यानंतर मी त्या इसमास "आपल हे ना, एक काम होत, पाच किला वॅटच, हे साहेबांनी 25,000/- रुपये तुझ्याकडे दयायला सांगीतलय" असे म्हणुन माझे पँटच्या खिशातील लाच रक्कम उजव्या हाताने काढुन त्या इसमासमोर धरली. त्यावेळी सदर इसमाने "हा.... हं" म्हणत लाच रक्कम त्याचे उजव्या हाताने स्विकारुन त्याचे पँटच्या पुढील बाजुच्या उजव्या खिशात ठेवली. त्यानंतर मी लाच रक्कम स्विकारलेबाबत पुर्वनियोजीत इशारा केला. त्यावेळी पोनि लोणारे व त्यांचे पथकाने येऊन नमुद इसमास ताब्यात घेवुन पोशि ठाकुर यांनी त्या इसमाचा उजवा हात मनगटाच्या वर पकडला व पोशि दिवेकर यांनी त्याचा डावा हात मनगटावच्या वर पकडुन त्याला ताब्यात घेतले. ती वेळ 10.43 वा. ची होती. त्यानंतर पोनि लोणारे यांना मी लोकसेवक नरवडे हे त्यांचे केबीनमध्ये बसल्याचे सांगीतले पोनि लोणारे यांनी तात्काळ लोकसेवक रामप्रसाद नरवडे यांनाही ताब्यात घेतले. सदरच्या खाजगी इसमास पोनि लोणारे यांनी नरवडे यांचे केबीनमध्ये घेवुन येवुन लाच रक्कम स्विकारलेल्या इसमास त्याचे नाव विचारले असता त्याने त्याचे नाव शामलाल असोकन असे सांगीतले त्यावेळी पोनि लोणारे यांनी सदर इसमास लाच रक्कम कोठे आहे या बाबत विचारणा केली असता शामलाला असोकन याने त्याचे उजव्या हाताने त्याचे पॅन्टच्या उजव्या खिशातुन लाच रक्कम काढुन पोनि लोणारे यांचेसमक्ष धरली. पोनि लोणारे यांनी सदर इसमास लाच रकमेबाबत विचारणा केली असता त्याने सदरची रक्कम ही नरवडे साहेब यांचे सांगणेवरुन घेतली आहे असे सांगीतले. त्यानंतर सदरची रक्कम ही पंच क्रं 2 पासलकर यांनी पोनि लोणारे यांचे सांगणेवरुन ताब्यात घेतली.

त्यानंतर पो.नि. लोणारे यांनी लोकसेवक रामप्रसाद नरवडे यांना त्यांचे पुर्ण नाव-पत्ता विचारले असता त्यांचे नाव त्यांनी त्यांचे नाव रामप्रसाद सुखदेव नरवडे, सहायक अभियंता, महावितरण, उपविभाग भोसरी - 2 रा.ठी.ंशिव रोड, ग्लोबल सेरेनीटी सोसायटी, ए - 701, बो-हाडेवाडी, मोशी असे सांगीतले. त्यानंतर पोनि लोणारे लाच रक्कम स्विकारलेल्या इसमास त्याचे नाव व पत्ता विचारला असता त्यांनी त्यांचे नाव शामलाल असोकन वय - 35, रा. सिल्व्हर नाईन सोसायटी, ई विंग फलॅट नं 1105, मोशी, पुणे असे सांगीतले. तेव्हा पो.नि. लोणारे यांनी लोकसेवक नरवडे यांचे कार्यालयात अंधार करुन लोकसेवक नरवडे यांचे सांगण्यावरुन इसम नामे शामलाल असोकन यांनी स्विकारलेल्या लाच रक्कमेची अल्ट्राव्हायलेट दिव्यामध्ये तपासणी केली असता त्यांचे उजवे हाताच्या पे-यावर तसेच त्यांचे ग्रे रंगाच्या पँटच्या उजव्या बाजुच्या खिशाच्या तोंडावर व आतील बाजुस अॅन्थ्रासीन पावडरची फिक्कट निळसर चकाकी दिसुन आली. त्यानंतर पो.नि. लोणारे यांनी लोकसेवक रामप्रसाद नरवडे यांचेकडील माझे कामासंदर्भातील सर्व कागदपत्रांबाबत विचारणा केली त्यावेळी त्यांनी ते कागदपत्र वरिष्ठ कार्यालयात पाठविले असल्याचे सांगीतले. त्यानंतर नमूद लोकसेवक व खाजगी इसम यांना ताब्यात घेवून आम्ही संपुर्ण सापळा पथक एमआयडीसी भोसरी पोलीस स्टेशन येथे पुढील कार्यवाही कामी परत आलो.

तरी दि. 04/06/2025 रोजी सकाळी 10.40 ते 11.30 वा दरम्यान व दि. 05/06/2025 रोजी सकाळी 10.20 ते सकाळी 11.30 वा दरम्यान झालेल्या पडताळणी व सापळा कारवाई दरम्यान स्पाईन रोडवरील महाराष्ट्र राज्य विदयुत वितरण कार्यालय, स्पाईन रोड, भोसरी 2 येथील कार्यालयात लोकसेवक रामप्रसाद सुखदेव नरवडे, सहायक अभियंता, महावितरण, उपविभाग भोसरी - 2 यांनी मी श्री मोहंमद अरिफ खान रा. गट नं 710 रोझे कॉम्प्लॅक्समागे कुदळवाडी चिखली यांचे वतीने त्यांना घरगुती विदुयत कनेक्शन घेऊन देणेकरीता केलेल्या



Scanned with CamScanner

अर्जावरुन विदुयत कनेक्शन देणेकरीता 35,000/- रुपये लाच रकमेची मागणी करुन तडजोडीअंती 25,000/- रुपये स्वत:करीता व साहेबांकरीता मागीतले व सदरची लाच रक्कम इसम नामे शामलाल असोकन वय - 35, रा. सिल्व्हर नाईन सोसायटी, ई विंग फलॅट नं 1105, मोशी, पुणे यांचे देण्यास सांगीतली. मी शामलाल असोकन यांना मी देत असलेली रक्कम हि लाच रक्कम असल्याचे सांगुनसुध्दा त्यांनी लोकसेवक नरवडे यांचे सांगणेवरुन माझ्याकडुन सदरची लाच रक्कम स्विकारली म्हणुन माझी नमुद दोन्ही इसमांविरुध्द कायदेशीर तक्रार आहे. सदर बाबत पोनि लोणारे साहेब यांनी घडलेल्या सर्व घटणेचा सविस्तर पंचनामा केला आहे.

माझा वरील जबाब मी वाचुन पाहीला असून, तो माझे सांगणे प्रमाणे संगणकावर मराठीत टंकलिखीत केला असून, तो माझे सांगणेप्रमाणे बरोबर व खरा आहे.

समक्ष हा जबाब लिहुन दिला स.ता.म

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

**or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):
NILESH VITTHAL TALEKAR
**Rank** (पद): SI (Sub-Inspector) **No.**(क्र.): PSI
**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):
**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)



Scanned with CamScanner

**14 Signature/Thumb impression of the complainant / informant.**
**(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):**

**15. Date and time of dispatch to the court**
**(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):**

ठाणे अंमलदार
M.I.D.C., भोसरी पोलीस स्टेशन,
पिंपरी चिंचवड

HC2797

**Signature of Officer in charge, Police Station**
**(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)**

**Name (नाव):** GANESH Jagannath J
**Rank(पद):** I (Inspector)
**No.(सं.):** PI



Scanned with CamScanner